(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | फ्लट नं-सी/13, गजानन नगरी इटखे,पैठण रोड, औरंगाबाद,गंगापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पत्ता | फ्लट नं-सी/13, गजानन नगरी इटखे,पैठण रोड, औरंगाबाद,गंगापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** Mobile (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. अविनाश महादेव शिंगटे | | | 1. तहसिलदार, गंगापुर ता गंगापुर ,गंगापूर, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रूपये दराच्या 140 नोटा | 70,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 70,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी - सचिन पोपटराव जाधव,वय-32 वर्ष,व्यवसाय- शिक्षण, रा.फ्लट नं-सी/13, गजानन नगरी इटखेडा, पैठण रोड, औरंगाबाद मोबा-8983228240.आरोपी - 1) श्री. अविनाश महादेव शिंगटे, तहसिलदार, गंगापुर ता. गंगापुर जि.औरंगाबाद 2) श्री. अशोक बाबुराव मरकड वय 55 वर्षे व्यवसाय- नोकरी, महसुल सहाय्यक तहसिल कार्यालय गंगापुर ता. गंगापुर जि.औरंगाबाद रा. चौधरी किराणा दुकानाजवळ, लक्ष्मी कालनी, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबादगु.घ. ता. वेळ व ठि. दि. 09/04/21 रोजी 16.50 वाजता तहसील कार्यालय गंगापूर येथे. दाखल करणार -स. फौ. सावंततपास पोलीस उपअधीक्षक मारोती मंडीत ला. प्र. विभाग औरंगाबाद खुलासा - समक्ष हजर राहून फिर्याद देतो कि. मी दिनांक 08/04/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे मला होत असलेल्या लाचमागणी बाबतची तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन एम.पी. ल कलेज, औरंगाबाद येथे शिक्षण घेत आहे. मौजे आपेगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे गट नं-19 मध्ये एकुण 6 एकर 36 गुंठे आमची वडीलोपार्जीत जमीन आहे. सदर मिळकतीच्या 7/12 वर माझे वडील श्री. पोपटराव धोंडीराम जाधव व आई सौ. नंदा पोपट जाधव यांचे नावाची नोंद असुन इतर हक्कामध्ये कुळ कायद्याप्रमाणे व्यवहार बेकायदेशीर असा शेरा आहे. मौजे आपेगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे गट नं-19 मधील 7/12 वर असलेला कुळ कायद्याप्रमाणे व्यवहार बेकायदेशीर हा शेरा कमी करणेबाबत माझे वडील श्री. पोपटराव धोंडीराम जाधव यांनी दिनांक 19/01/2021 रोजी मा.तहसिलदार साहेब, गंगापुर ता.गंगापुर जि. औरंगाबाद यांना अर्ज दिलेला आहे. त्यानंतर काही दिवसांनी सदर अर्जाचे संबंधाने मी श्री. अविनाश शिंगटे तहसिलदार गंगापुर यांना भेटलो असता त्यांनी सदर जमीनीच्या व्हल्युशनच्या अर्धी रक्कम तुम्हाला भरावी लागेल असे सांगितले. तेव्हा मी श्री. शिंगटे यांना पैसे भरण्यासाठी पावती मिळेल का ? असे विचारले तेव्हा त्यांनी श्री.अशोक मरकड महसुल सहाय्यक अधिकारी, गंगापुर यांना बोलावुन यांचे काय आहे ते बघुन घ्या असे सांगितले. तेव्हा श्री.मरकड यांनी तुम्हाला आरपीएडी करून देतो असे म्हणाले.त्यावरून मी दिनांक 07/04/2021 रोजी तहसिल कार्यालय गंगापुर येथे जावुन श्री. मरकड यांची भेट घेवुन आरपीएडी बाबत विचारले असता, जमीनीच्या व्हल्युशनच्या अर्धी रक्कम भरण्याऐवजी तुम्ही तहसिलदार साहेबांना 4,50,000/- रूपये द्या तुमचे काम होवुन जाईल. त्यावरून माझ्याकडे सध्या इतके पैसे उपलब्ध होणार नाही, असे म्हणालो असता त्यांनी माझेशी चर्चा करून तुम्हाला कमीत कमी 1,25,000/- रूपये तरी द्यावेच लागतील अन्यथा तुमचे काम होणार नाही असे म्हणाले. त्यावर माझी लाच देण्याची इच्छा नसल्याने नाईलाजाने मी त्यांना उद्या येवुन भेटतो असे म्हणुन तेथुन निघुन आलो आहे. मी तहसिलदार श्री. अविनाश शिंगटे साहेब व सहाय्यक अधिकारी श्री. अशोक मरकड यांना लाच दिली नाही तर ते मौजे आपेगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील आमचे वडीलोपार्जीत असलेली जमीन गट नं-19 मधील 7/12 वर असलेला कुळ कायद्याप्रमाणे व्यवहार बेकायदेशीर, हा शेरा

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण  **P.S.(ठाणे):** गंगापूर  **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0135  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/04/2021 23:12 वजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 09/04/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/04/2021
**Time From (वेळेपासून):** 16:50 वजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:00 वजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/04/2021  **Time (वेळ):** 23:03 वजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 023  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/04/2021 23:03 वजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** नैऋत्य, 1.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तहसिल कार्यालय गंगापुर येथील उ

**(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सचिन पोपटराव जाधव

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

कमी करून देणार नाही. श्री. शिंगटे साहेब व श्री. मरकड यांचेशी माझी वैरदुष्मनी नाही किंवा देणे घेण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. आज दिनांक 08/04/2021 रोजी तहसिलदार श्री. शिंगेट साहेब व श्री. मरकड यांची मी तहसिल कार्यालय गंगापुर येथे भेट घेण्यासाठी जाणार आहे. तेव्हा तहसिलदार श्री. शिंगेट साहेब व श्री. मरकड यांनी माझ्याकडे 1,25,000/- रूपये लाचेची मागणी करून 1,25,000/- रूपयाची लाच स्वत: किंवा इतरामार्फत स्विकारल्यानंतर त्यांना पकडुन कायदेशिर कारवाई करावी हि विनंती. अशी तक्रार दिली होती. माझे तक्रारीचे अनुषंगाने पोलीस उपअधिक्षक श्री. मारूती पंडीत यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे दिनांक 08/04/2021 रोजी गोपनीय कामासाठी हजर असलेले पंच 1) श्री. हरिदास सपकाळ, शिल्पनिदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद. 2) श्री. प्रकाश पोपळघट, कनिष्ठ सहाय्यक, जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग, औरंगाबाद यांना त्यांचे कक्षात बोलावुन त्यांचा ओळख परिचय करून दिला. त्यानंतर मी माझी तक्रार त्यांना तोंडी थोडक्यात सांगितली. त्यानंतर मी लेखी दिलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली, पंचांनी ती वाचल्यानंतर पो.उपअधि श्री. पंडीत व पंचांनी सदर तक्रारीवर सह्या केल्या. त्यानंतर तहसिल कार्यालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे जावुन तहसिलदार श्री. अविनाश शिंगटे व सहाय्यक अधिकारी श्री. अशोक मरकड यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय पोलीस उपअधिक्षक श्री. पंडीत यांनी माझे व पंचांचे संमतीने घेतला.त्यानंतर पो.उपअधि श्री.पंडीत यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथक, पंच क्र. 2 व पो.उपअधि श्री. पंडीत असे खाजगी कारने तर पंच क्र. 1 श्री. सपकाळ यांना सोबत घेवुन मी माझेकडील मोटारसायकल क्र. एम.एच 20 जे 7260 ने लाचलुचपत कार्यालय येथुन निघुन तहसिल कार्यालय गंगापुर जवळील सुरक्षित ठिकाणी गेलो. तेथे मला थोडक्यात सुचना देवुन व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर चालु करून माझे जवळ देण्यात आले. मी पंच क्र.1 श्री. सपकाळ यांना सोबत घेवुन माझेकडील मोटार सायकलने तहसिल कार्यालय गंगापुर येथे गेलो असता तेथे तहसिलदार श्री. शिंगटे कार्यालयात नसल्याने मी श्री. मरकड यांची भेट घेतली असता त्यांनी, मौजे आपेगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील आमचे वडीलोपार्जीत असलेली जमीन गट नं-19 मधील 7/12 वर असलेला कुळ कायद्याप्रमाणे व्यवहार बेकायदेशीर हा शेरा कमी करून देण्यासाठी 1,25,000/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करून त्यापैकी 70,000 /- रूपये आता व उर्वरीत रक्कम काम झाल्यावर स्विकारण्याचे मान्य केले. सदर लाचेची रक्कम सायंकाळ पर्यंत तहसिल कार्यालय गंगापुर येथे घेऊन येण्यास सांगितले. परंतु माझेकडे सायंकाळ पर्यंत लाचेची रक्कम उपलब्ध होणार नसल्याने दिनांक 09/04/2021 रोजी सापळा लावण्याचा निर्णय पो.उपअधि श्री. पंडीत यांनी माझे व पंचाचे संमतीने घेतला. त्यानंतर पो.उपअधि श्री. पंडीत यांनी सदरबाबत गोपनीयता बाळगण्याच्या सुचना देवुन मला दिनांक 09/04/2021 रोजी तहसिल कार्यालय गंगापुर जवळील नियोजीत सुरक्षित ठिकाणी हजर राहण्याचे सांगितले. पोलीस उपअधिक्षक श्री.पंडीत यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 09/04/2021 रोजी मी तहसिल कार्यालय गंगापुर जवळील नियोजीत सुरक्षित ठिकाणी हजर आलो. तेव्हा पो.उपअधि श्री. पंडीत, दोन्ही पंच व सापळा पथक दोन खाजगी कारने सदर ठिकाणी हजर आले. तेव्हा श्री. मरकड यांना लाच म्हणुन देण्याकरीता 500/- रूपये दराच्या 140 नोटा मी हजर केल्या. त्यावेळी मला व पंचांना ॲन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत प्रात्यक्षिक करून दाखवुन सापळा कारवाई संबंधाने सुचना दिल्या. सदर नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुन माझे पन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर चालु करून माझेकडे देण्यात आले. पो.उपअधि. श्री.पंडीत यांचे सुचनेप्रमाणे मी पंच क्र.1 श्री. सपकाळ यांना सोबत घेवुन माझेकडील मोटार सायकलने तहसिल कार्यालय गंगापुर येथे गेलो. पाठोपाठ पो.उपअधि श्री. पंडीत, सापळा पथकातील काही सदस्य एका कारने तर पो.नि श्री. घनवट, उर्वरीत सापळा पथकातील सदस्य ,पंच क्र 2 श्री.पोपळघट असे. दुस-या कारने तहसिल कार्यालयाचे आवारात येवुन कार पार्कीग करून कोणास संशय येणार नाही अशा रीतीने सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री. सपकाळ असे तहसिल कार्यालय गंगापुर येथे श्री. मरकड यांचे कक्षात गेल्यानंतर त्यांचेत व माझेत चर्चा होवुन त्यांनी मला तहसिलदार श्री. अविनाश शिंगटे याचे केबिनमध्ये घेवुन गेले. तेथे माझी तहसिलदार श्री. शिंगटे यांची भेट करून दिली. त्यावर मागणी प्रमाणे 70,000/- रूपये लाचेची रक्कम श्री. मरकड यांचेकडे देणेबाबत तहसिलदार श्री. अविनाश शिंगटे यांनी संमती दिली. त्यानंतर श्री. शिंगटे मला सदर आवारात असलेल्या कोषागार कार्यालयात घेवुन गेले तेथे. मागणी प्रमाणे 70,000/- रूपये लाचेची रक्कम माझेकडुन श्री. अशोक मरकड यांनी स्वत: स्विकारून त्यांने पन्टचे डावे बाजुचे समोरील खिशात ठेवली. त्यानंतर मी 16.50 वाजेच्या सुमारास पुर्वनियोजीत इशारा करताच पो.उपअधि श्री. पंडीत, पो.नि श्री. घनवट, सापळा पथक, पंच क्र.2 श्री. पोपळघट यांचेसह सदर ठिकाणी हजर आले. त्यावेळी पो.उपअधि श्री.पंडीत यांनी श्री. मरकड यांना त्यांचा ओळख परिचय देवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे नाव अशोक बाबुराव मरकड वय 55 वर्षे व्यवसाय- नोकरी, महसुल सहाय्यक तहसिल कार्यालय गंगापुर ता. गंगापुर जि.औरंगाबाद रा. चौधरी किराणा दुकानाजवळ, लक्ष्मी कालनी, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद असे सांगितले. श्री. अशोक मरकड, महसुल सहाय्यक यांचे पन्टचे डावे बाजुचे समोरील खिशातुन लाचेची रक्कम 70,000/- रूपये पंचासमक्ष जप्त करण्यात आली असुन सदर नोटांचे क्रमांक व वर्णन मी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळुन आले आहे. अशा प्रकारे दिनांक 08/04/2021 रोजी श्री. अशोक मरकड यांनी मौजे आपेगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील आमचे वडीलोपार्जीत असलेली जमीन गट नं-19 मधील 7/12 वर असलेला कुळ कायद्याप्रमाणे व्यवहार बेकायदेशीर हा शेरा तहसिलदार साहेबांकडुन कमी करून देण्यासाठी 1,25,000/- रूपये लाचेची पंचासमक्ष मागणी करून त्यापैकी 70,000/- रूपये आता व उर्वरीत रक्कम काम झाल्यावर स्विकारण्याचे मान्य केले. दिनांक 09/04/2021 रोजी मागणी प्रमाणे 70,000/- रूपये लाचेची रक्कम श्री. मरकड यांचेकडे देणेबाबत तहसिलदार श्री. अविनाश शिंगटे यांनी संमती दिल्यानंतर 70,000/- रूपये लाचेची रक्कम 16.50 वाजता तहसिल कार्यालय गंगापुर येथील उपकोषागार कार्यालय, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे पंचासमक्ष माझेकडुन श्री. अशोक मरकड यांनी स्वत: स्विकारली आहे, म्हणुन माझी 1) श्री. अविनाश महादेव शिंगटे, तहसिलदार, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद 2) श्री. अशोक बाबुराव मरकड वय 55 वर्षे व्यवसाय- नोकरी, महसुल सहाय्यक तहसिल कार्यालय गंगापुर ता. गंगापुर जि.औरंगाबाद रा. चौधरी किराणा दुकानाजवळ, लक्ष्मी कालनी, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Sanjay Mahadev Lohakare(I (Inspector)) / pi or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Jadhav

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलिस ठाणे अमलदार
पोलिस स्टेशन गणपत

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): Sanjay Mahadev Lohakare
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): pi